# नग्नतेचे विरोधक

( फ्रेंचवरून )

पुढील हकीकत फ्रान्समधील नग्नतेच्या मुख्य पुरस्कर्त्यानें स्वतःचे मासिकांत लिहिली आहेः—

नग्नतेवर मत बनवण्यापूर्वी आमच्या संघास भेट देऊन प्रत्यक्ष अवलोकन कराव, असें मी आमच्या विरोधकांस नेहमी सांगत असतों. त्यांपैकी एकाने हें कबूल केलें, तेव्हां मी त्याचे घरीं त्याला भेटावयास गेलों. आमचेमधें पुढील संभाषण झालें.

**तोः** या, बसा.

**मीः** आपण आमचा क्लब पहायला येणार हें ऐकून फार आनंद झाला. या शहरांत मला यायचेंच होतें, तेव्हां म्हटलें तुम्हाला भेटून जावें.

...त्यासंबंधी आपण बोलूं. पण प्रथम हा चिरूट तर घ्या. नाही ओढीत ? तरमग एक मद्याची बाटली काढतों, तें तर घ्याल की नाही थोडेंसें माझ्याबरोबर ?

...आपले फार उपकार आहेत, पण सकाळीं दहा वाजतां मद्य...

...घ्याच तुम्ही, नाही नका म्हणूं. हें पहा, ही बाटली ३० वर्षांची जुनी आहे. हिची लज्जत तर पहा, तुमच्या **पॅरिस**ला नाही अशी मिळायची.

...बरें बुवा, तुम्ही म्हणतांच तर पाहूं या. एकंदरींत नीति म्हणजे केवळ रूढीचाच प्रश्न आहे म्हणायचा. माफ करा हां, पण तुमच्या लिहायच्या टेबलावर चिरुटांशिवाय आणखी 'पाइप'हि बरेच दिसताहेत, आणि सकाळीं १० वाजतां तुम्ही मला दारू प्यायला सांगतां. आमच्या संघांतले लोक याला अनीति म्हणतात, आणि तुम्ही नग्नतेला अनीति समजतां. आहे की नाही गंमत ?

...काय म्हणतां, तुम्ही लोक तंबाखू ओढीत नाही आणि मद्यहि पीत नाही ?

...आमच्यापैकीं बहुतेक लोक तंबाखू आणि दारूपासून दूर राहतात, आणि बाकीचे तसा प्रयत्न करतात, आणि कांही झालें तरी निदान सकाळीं दहा वाजतां नाही पीत! शरीराला किंवा मनाला बाधा करणाऱ्या गोष्टींनाच ते अनीति समजतात.

...अहो पण माझें वय ५३ वर्षांचें आहे, माझी प्रकृति उत्तम आहे आणि मी कामहि कांही कमी नाही करीत !

...माफ करा, पण तुमची प्रकृति तुम्हाला वाटते तितकी चांगली नाही अशी मला भीति वाटते. तुमचा चेहरा लाल आहे, पोट मोठें आहे. हीं चांगल्या प्रकृतीचीं लक्षणें नव्हत. तुम्ही काम करतां हें मी कबूल करीन, पण तें तंबाखूच्या आणि दारूच्या जोरावर न करतां खरोखरच प्रकृतीच्या जोरावर कराल तर तुम्हाला यापेक्षांहि जास्त आणि चांगलें काम करतां येईल.

...हं, असें तुम्ही म्हणतां, पण कोणीं सांगावें? बरें, आतां मी तुम्हाला कांही प्रश्न विचारतों, त्यांचीं उत्तरें मोकळेपणाने द्याल का?

...जरूर.

...तुमच्या क्लबांत खरोखरच का बायका आणि पुरुष अगदीं साफ नागवीं असतात?

...अगदीं साफ नागवीं.

...मला हें खरेंच वाटत नाहीं. आणि तुम्ही म्हणतां पुरुषांवर याचा कांही दृश्य परिणाम होत नाही? आणि कांही लज्जास्पद प्रकारहि तेथें होत नाहीत!

...मी तुम्हाला अशी खात्री देतों की पुरुषांच्या मनांत चलबिचल झाल्याचें बिलकुल चिन्ह दिसत नाही. तुम्हाला जें इतकें चमत्कारिक वाटतें त्याकडे त्यांचें लक्षच जात नाहींसें होतें आणि नीतीला बाध येण्यासारखें कांहीही तेथें होत नाही.

...पण हें खरें तरी कसें वाटावें? तुम्ही लोक नपुंसकहि नाही आणि

साधूहि नाही. मी स्वतः कांही आतां तरुण नाही, पण माझ्या दृष्टीला जर नागव्या बायका पडल्या तर खात्रीने मला लपून बसायची वेळ येईल !

...तुमची कदाचित अशी स्थिति होईल, पण त्याचें कारण तुम्ही तंबाखू फार ओढतां, सकाळीं दहा वाजल्यापासून दारू पितां, आणि तुमचें जेवणहि तसेंच असणार, म्हणजे हितावह नसणार...तरी देखील तुम्ही म्हणतां तशी तुमची स्थिति होईलच अशी माझी मुळीच खात्री नाही, कारण नग्नता उद्दीपनाला पोषक नाही. मी तुमच्यापक्षां तरुण आहें, मी नपुंसक नाही आणि साधूहि नाही, तरी पण उद्दीपनामुळे नग्नसंघांतून पळून जाण्याची वेळ मला कधीहि आलेली नाही.

...हो पण तुम्हाला संवय झाली आहे.

...पण नवीन सभासद येतात त्यांचीहि कधी फजीति होत नाहीं. मला वाटतें त्याचें कारण असें आहे, की स्त्रीपुरुषांची एकमेकांना नग्न पाहण्याची स्वाभाविक इच्छा असते, आणि त्यांत बिलकूल अनीति नाही. ही नैसर्गिक इच्छा आमच्या संघांत पुरी होते. आणि कोणतीहि इच्छा पूर्ण होण्यानें नेहमी मन शांत होतें.

...मला नाही असें वाटत. तुमचें मत खरोखरच तसें असेल, परंतु तुमच्या नकळत, एखाद्या झाडाझुडपाआड यापेक्षां जास्त कांहीं प्रकार होत नसतील, हें मी नाही कबूल करणार.

...माझी खात्री आहे की जसें कांही होत नाही म्हणून. पण असें कांही झालें असेंहि क्षणभर समजलें, तरी त्याची जबाबदारी नग्नतेवर कशी येते ? इतर प्रकारच्या क्लबांत देखील अशाच गोष्टी होणें शक्य नाही का ?

...होतील, पण तें जास्त कठीण आहे.

...ही मात्र तुमची चूक आहे. इतर क्लबांत कपडे असल्यामुळें लपवणें सोपें होतें आणि मुद्देमालासकट पकडतां येत नाही.

...बरें, मी स्वतःच येऊन पाहीन काय होतें तें !

यानंतर दोन महिन्यांनी एका आदितवारीं या गृहस्थांनी आमच्या क्लबांत येण्याचा धीर केला. त्यांच्या नशिबाने धोधो पाऊस पडत होता. ते आले आहेत अशी बातमी मिळाल्याबरोबर मी सामोरा गेलों.

...या, आलांत, फार बरें झालें. पण तुह्मीं फार उशीर केलात, तुह्मीं जेवायला यायचें असें ठरलें होतें.

...हो, पण मीं आधीं पाद्र्याकडे गेलों, त्यामुळें 'बस' चुकली.

...मग, पाद्री काय ह्मणत होता ?

...कांही विशेष नाही. पण तुमच्यापैकीं कोणी प्रार्थनेला जात नाही असें तो ह्मणाला.

...चर्च जरा लांब आहे म्हणून, एरवी आमच्यांत धार्मिक लोकही पुष्कळ आहेत.

...बस चुकल्यामुळें मला या पावसांत पायीं यावें लागलें. माझे कपडे जरा वाळत टाकायला आणि थोडी गरम कॉफी द्यायला सांगतां का ?

मी त्यांना कॉफी द्यायला सांगितली आणि एक पायघोळ झगा दिला, ह्मणजे त्यांना थंडीही वाजूं नये आणि त्यांच्या शहरी कपड्यांकडे कोणाचें लक्ष जाऊं नये. कॉफी झाल्यावर मीं ह्मटलें,

...चला तर आतां, जरा बाहेर हिंडूं.

...पण पाऊस पडतो आहे की !

...पाऊस पडतो आहे, आणि आह्माला ह्मणजे अशीच हवा आवडते असें नाही, पण काय करणार ? पाऊस पडतो ह्मणून कांही आह्मी बसून रहात नाही ! आणि तुमची प्रकृति चांगली आहे ह्मणतां, मग तुह्मांला काय भीति आहे?

...हं,...चला तर.

...तुम्ही बसा असे येथे, ह्मणजे तुह्मांला पाऊसहि नाही लागणार, आणि दिसेलहि. आमची आतां व्यायामाची वेळ झाली, मला गेलें पाहिजे.

मी व्यायाम करणारांत मिसळलों आणि संपल्यावर परत आलों. ते ह्मणतातः—

...कमाल आहे बुवा तुमची ! मला हें समजत नाहीं की ही बायका मुलें देखील, खालीं तळें झालेलें आणि वरून सारखा पाऊस पडत असतांना, अशा तऱ्हेचा व्यायाम करतात कसा ?

...हा सगळा नग्नतेचा परिणाम आहे. ती बाई पाहिलीत, तिच्या अंगावर तो वण दिसतो आहे ती? एकदां फुस्फुसांच्या आणि एकदां मूत्रपिंडाच्या रोगामुळे, अशी तिच्यावर दोनदां शस्त्रक्रिया केलेली आहे. तिच्याबरोबर आहेत त्या तिच्या मुली, एक ३ आणि दुसरी ५ वर्षांची. ती एक बाई तिकडे पळते आहे ती, ५ मुलींची आई आहे, आणि त्या सगळ्या येथें येतात. हा मनुष्य आपल्याकडे येतो आहेना, हा प्रसिद्ध चित्रकार **पॅलिए** आणि ती त्याची १९ वर्षांची मुलगी.

...तीं मला ओळखीत नाहीत, तेव्हां मीं त्यांना कांही प्रश्न विचारूं का ?

...खुशाल विचारा.

कांही वेळाने आह्मी आफिसांत भेटलों. पाहुणे म्हणाले, हें कांही विलक्षण आहे बुवा. मीं पुष्कळांना विचारलें, ते ह्मणतात आह्मी शाकाहारी आहों. मग अशा प्रकारचा व्यायाम आणि इतके श्रम त्यांना झेंपतात कसे ?

...त्यांत विशेष कांही नाही. ते आरोग्याचे नियम पाळतात, इतकेंच. हे पहा डॉ....आले, यांना कांही विचारा पाहिजे तर.

...बरें, मला काय पाहिजे होतें तें मीं पाहिलें, आतां जाण्यापूर्वी फक्त आपले आभार मानायचे राहिले आहेत.

...मग आमची पद्धत बरोबर आहे आणि येथें अनीति नाही, अशी आपली खात्री झालीच असेल. आपल्या मित्रांना सांगा की त्यांनाहि येथें यायला मोकळीक आहे.

मला आणखी एकच गोष्ट तुम्हाला सांगायची 'आहे. नग्नतेचे पुरस्कर्ते अनीतिमान आहेत असें पाहिजे तर तुम्ही समजा. पण मी असें विचारतों की नग्न स्त्रियाच जर पहायच्या असतील तर त्याकरतां काय अशा पावसांत इतक्या लांब यावें लागतें ! यापेक्षां कमी पैसे खर्च करूनहि **पॅरिस**मधेंच नग्न स्त्रिया

दिसतील इतकेंच नव्हे तर आणखीहि पाहिजे तें मिळेल. मला थोडीशी तरी अक्कल आहे इतकें तुम्हाला कबूल असलें, तर कायद्यांत न सांपडतां आणि यापेक्षा कमी खर्चानें आणि खटाटोपानें **पॅरिस**मधल्या एखाद्या वेश्यागृहांतल्या सगळ्या स्त्रिया मला स्वतःभोंवती नंग्या नाचवतां आल्या असत्या, इतकें सुद्धां मला कळणार नाही का ? तेव्हां यांत कांही विशेष उद्देश आहे, केवळ नग्न स्त्रिया पाहण्याचा नव्हे, असें कबूल करायला काय हरकत आहे ?

---

# ग्रंथपरीक्षण

**आंधळ्यांची शाळा.** लेखकः **श्री. वि. वर्तक**, बी. ए. प्रकाशक ट्युटोरिअल प्रेस, गिरगांव बॅकरोड, मुंबई नं. ४

प्रस्तुत चार अंकी नाटकाचा विषय जरी एका यूरोपीय नाटककाराच्या कृतीवरून सुचला असें लेखकानें 'निवेदनांत' सांगितलें आहे तरी 'एकंदर मांडणी, विचारसरणी व त्यानें काढलेला निष्कर्ष' यांत लेखकानें फरक केलेला असल्या-मुळे याचा स्वतंत्र नाटक अशा दृष्टीनेच विचार करण्यास हरकत नाही.

या नाटकाची नायिका **बिंबा** ही एम्. ए. झालेली असून तिनें एक आंधळ्यांची शाळा काढलेली आहे. आपल्या निकटचीं सर्व माणसें अत्यंत पवित्र आहेत अशा खोट्या कल्पनेंत तिला तिच्या आईने वाढविली आहे. पण वस्तुतः तिच्या बापाची एकपत्नीव्रताशीं ओळख नाही. अशा स्थितींत तिची **'कुमार'**शीं ओळख होऊन त्यांचें लग्न ठरलेलें असतांना नाटकास प्रारंभ होतो. एक गृहस्थ तिला भेटायला येतो आणि कुमाराचें आपल्या बायकोवर प्रेम अस-ल्यामुळे ती झुरणीस लागून मेली आणि तिला एक मूल झालें होतें, त्याचा तोंडवळा कुमारासारखा होता अशी हकीकत तिला सांगतो. तिचा विश्वास बसत नाही, पण इतक्यांत कुमार तेथें येतो आणि त्या गृहस्थास पाहून त्याचे अंगावर

जातो. तें पाहून बिंब्रास सर्व खरें वाटून ती कुमारास तेथून घालवून देते. तिने लग्न मोडलें तरीहि तिचें कुमारावर प्रेम राहतेंच, आणि तिला खरी स्थिति कळल्यानेच सर्व सुखी होतील अशा विश्वासाने तिचा मानलेला काका **विश्वनाथ** तिला बापाचें चारित्र्य कळवतो. ती संतापून आजीजवळ बापासंबंधी जें बोलते तें तो आंतल्या खोलींतून ऐकतो आणि आपली मुलगी आपला तिरस्कार करते हा विचार सहन न होऊन तो घर सोडून जाऊं लागतो. तें मात्र प्रेमळ मुलीला सहन न होऊन ती त्याला जाऊं देत नाही आणि त्याशीं समेट करते. बापाचें चारित्र्य असें असतांना कुमाराला घालवून देण्याचा आपल्याला हक्क पोंचत नाही हें उमजून ती त्याची माफी मागते आणि मोडलेलें लग्न पुन्हा जमतें.

स्त्रीपुरुषसंबंधांत खरें बोलण्याचा प्रयत्न करणारीं नाटकें मराठींत तर नाहीतच, पण इंग्रजींतहि नाहीत, निदान इंग्रजांनी लिहिलेलीं नाहीत, थोडींफार आहेत तीं भाषांतरें आहेत. खरें बोलणारे कित्येक इंग्रज लेखक आहेत, परंतु त्यांनी नाटकें लिहिलेलीं नाहीत, यामुळे मराठी किंवा इंग्रजी नाटकांचा नेहमीचा सांचा म्हणजे मनुष्यजातीचे चांगले आणि वाईट असे दोन भाग करून, एका विभागांतील लोकांचें प्रेम 'सात्विक' आणि एकाच व्यक्तीवर अखंड टिकणारें, आणि दुसऱ्या विभागांतील लोकांचें मात्र कामुक आणि नाचरें असायचें. अर्थात वस्तुस्थितीचा आणि या नाटकांचा फारसा संबंध नसतो, परंतु नाटकांवर ज्यांना पैसे मिळावयाचे असतात त्यांना लोकप्रिय होतील अशींच नाटकें लिहावीं लागतात. यामुळेच **शॉ**सारख्या नाटककाराला देखील या बाबतींत फारसें खरें बोलतां येत नाही, कारण तीं इंग्रज प्रेक्षकांपुढें येणार. यूरोपांतील इतर भाषांत खरें बोलणारे नाटककार असतात, कारण इतर युरोपीय लोक इंग्रजांचे इतके ढोंगी नाहीत. परंतु अशा नाटकांचीं इंग्रजींत भाषांतरें झालीं तरीहि त्यांचे प्रयोगांस परवानगी मिळत नाही, कारण तीं ढोंगाच्या आड येतात.

अशा स्थितींत प्रस्तुत नाटकांत जो खरें बोलण्याचा प्रयत्न केलेला दिसतो

त्याबद्दल लेखकाचें अभिनंदनच केलें पाहिजे. मूळ ज्या नाटकावरून श्री. वर्तकांस या नाटकाची कल्पना सुचली, तें आमच्या वाचण्यांत नाही, तथापि यांत जें विचारांचें धैर्य दिसतें, त्याचें श्रेय बहुधा मूळ ग्रंथकारासच द्यावें लागेल असा आमचा तर्क आहे, तरी देखील हा प्रकार मराठींत आणण्याचें धैर्य वर्तकांनी दाखवलें हेंहि थोडें नाही. 'प्रत्येक मुलीने जर नवरदेवाच्या गतचारित्र्याचा आढावा काढावयास सुरवात केली तर जगांतलीं निदान शेंकडा नव्व्याण्णव लग्नं तरी मोडावीं लागतील.' (पान ६४) 'जिच्यावर जगांतला फक्त एकच पुरुष प्रेम करूं शकतो ती कितपत लायकीची स्त्री असेल......माझ्या संबंधी म्हणशील तर आजपर्यंत शेकडों बायकांनी माझ्यावर प्रेम केलें आणि मी स्वतः सुद्धा हजारो बायकांवर प्रेम करीत आलों आहें. कोणाचे डोळे सुंदर ह्मणून कुणी मला आवडली तर कोणाच्या गालाला सुंदर खळी पडते ह्मणून आवडली...' (पान १३६–३७) अशा प्रकारचे विचार मराठी नाटकांत सापडणेंच कठिण, मग ते प्रमुख पात्रांच्या तोंडांत येणे अशक्यच, अशी आजपर्यंतची स्थिति आहे. मराठी वाङ्मयांत जी नीतिबाजी बोकाळलेली दिसते ती हिंदुस्थानांत इंग्रजी वाङ्मयाला फाजील महत्व मिळाल्यामुळेच आली असावी. ती संस्कृतांत नाही. संस्कृत नाटकांत चारुदत्तास एक प्रेमळ पत्नी असतांहि त्याचें व वसंतसेनेचें प्रेम रंगभूमीवर राजरोसपणें येऊं शकतें आणि तें संस्कृतच असल्यामुळे त्याचें भाषांतर मराठी रंगभूमीवरहि चालतें, इतकेंच नाही तर चारुदत्ताला त्यामुळें कोणताही कमीपणा येत नाही. परंतु असा नायक मराठी नाटकांत किंवा कादंबरीत घालण्याचें धाडस कोणी करीत नाही, किंवा प्रेमासंबंधी ठराविक सांच्याबाहेरचे विचारहि कोणी मांडीत नाही. असे कांही विचार या नाटकांत मांडल्याबद्दल आह्मी श्री. वर्तकांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

नाटकांतील पात्रांसंबंधी विचार केल्यास लेखकाचा व आमचा कदाचित मतभेद होण्याचा संभव आहे. प्रमुख पात्रांपैकी आमचे मतें **सुशीला** सर्वांत हीन दर्जाची आहे व तिच्या स्वभावनिरूपणांत एक दोषहि दिसतो. आपलें **मनोहरावर** प्रेम नाही हें जाणून जी बाई त्याच्याशीं आपल्या सोयीकरतां

खुशाल लग्न करते, तिला त्याच्या अखंड प्रेमाची अपेक्षा करण्याचा काय हक्क आहे ? लग्नानंतर पतिपत्नींत प्रेम उत्पन्न झालेंच पाहिजे अशी अपेक्षा कदाचित लहानपणीं लग्न झालेल्या असमंजस मुलीची असेल, परंतु जिचें प्रेम अगोदरच दुसऱ्यावर आहे तिने भलत्याशीं लग्न करणें म्हणजे कायदेशीर वेश्यावृत्ति आहे. अशी स्त्री बाळंतपणाच्या १२ व्या दिवशीं नवऱ्याच्या वागणुकीमुळे संतापून त्रागा करून घर सोडून जाईल असें वाटत नाही. विवाहामुळें मालकीहक्क उत्पन्न होतो, आणि प्रेमाच्या अभावींहि असूया दिसत नाही असें नाहीं, पण ज्या सात्विक संतापाने ती निघून गेली असें दाखवलें आहे, तो प्रेमाशिवाय उत्पन्न होणार नाहीं. ती गेली तर त्याचें एकच सयुक्तिक कारण संभवतें, की तिचें विश्वनाथावर खरें प्रेम असल्यामुळे त्याजकडे जाण्यास तिला सबब पाहिजे होती. अर्थात अंतःस्थ कारण हेंच असून तिने रागाचा अविर्भाव करणें शक्य आहे, परंतु मनोहरला लेक्चर देण्याचा हक्क मात्र तिला बिलकुल नाही. आपण इब्सेन व शॉच्या शाळेंत तयार झालों अशी तिला घमेंड आहे, पण वस्तुतः तसें असतें तर तिने आपल्या मुलीला अज्ञानांत ठेवली असती काय ? आधुनिक सुशिक्षित स्त्रीच्या कर्तव्याची जाणीव तिला नाही. तसेंच सुंदर स्त्रीला सौंदर्याची जाणीव असणें साहजिक आहे, परंतु अण्णासाहेबांनी तिला मागणी प्रेमामुळें केली की सौंदर्यामुळें, असें तिनेच त्यांस विचारणें मात्र चमत्कारिक दिसतें.

तसेंच कुमाराचा बाप अण्णासाहेब जरी मिनिस्टर असला तरी मनोहरच्या मुलीला जर तो सून करून घ्यायला तयार आहे तर तो 'शेक् हँड्' करूं गेला असतां इन्कार करण्याचें काय कारण आहे ? मनोहरच्या चारित्र्यामुळे म्हणावें तर व्यवहारज्ञानाच्या गोष्टी तोच सांगतो. मुलाला बिंबाने हांकून दिल्यामुळे अपमान झाला हें कारण म्हणावें तर तो बिंबाशीं नरम बोलतो, आणि अपमानामुळे तो इतका रागावला असता तर पुन्हां लग्नाच्या गोष्टी बोलायला आला नसता. मनोहरचा दर्जा मित्राचा होता, नोकराचा किंवा याचकाचा नव्हता, त्याचा असा अपमान करणें मिनिस्टरला देखील शोभत नाही. एखादा हीन दर्जाचा मनुष्य एकदम मिनिस्टर

झाला असता तर कदाचित असा वागला असता, पण स्वतःच्या कर्तबगारीने वर चढलेल्या अण्णासाहेबाने इतकें उद्दाम कां व्हावें ?

इतर पात्रांचा स्वभावपरिपोष चांगला झाला आहे. कांही भाषणें फाजील लांब झालीं आहेत, तीं जरी सकारण लांब असलीं तरी नाटकाच्या दृष्टीने तीं तोडण्याची कांहीतरी युक्ति केली पाहिजे होती. तसेंच त्यांतील कांहो शब्द आणि वाक्यें सुशिक्षितांच्या संभाषणांत देखील अस्वाभाविक दिसतात. उदाहरणार्थः—निर्व्याज, कर्तव्यविन्मुख, संशयनिवृत्ति, विचार-विनिमय, 'आपलं गतचारित्र्य जर उज्ज्वल नव्हतं,' 'गुरुत्वमध्य सुटलेल्या वस्तूसारखी माझी स्थिति झाली आहे,' वगैरे. 'ध्यावयास' हें रूप संभाषणांत येत नाही. असहाय्य, निःसहाय्य, पडीन, म्हणीन, हे शब्द चूक आहेत, आणि हे सर्व मुद्रणदोष असावेसें दिसत नाही. 'पांच मिनिटांकरतां गेले आहेत बाहेर' हें वाक्य मराठी दिसत नाही. सुशीलेचें नांव सर्वत्र 'सुशिला' असें छापलें आहे, तें चूक आहे. सुशिक्षितांना मधून मधून इंग्रजी वाक्यें बोलण्याची संवय असते खरी, परंतु तीं जर नाटकांत घालायचीं असतील तर त्यांचा अर्थ केवळ मराठी जाणणारांस समजेल अशी कांही युक्ति केली पाहिजे, कारण अशा लोकांना नाटक समजणें जरूर आहे.

दोष कोणत्याही कृतींत असायचेच, तरी देखील हा ग्रंथ नाटक या दृष्टीने उत्कृष्ट झाला आहे. मात्र या नाटकाचें मर्म अशिक्षितांस कळणें कठिण, आणि शिवाय त्यांत संगीतहि नाही, तेव्हां तें लोकप्रिय होण्याची आशाच नाही. संभाषणांत संगीत अस्वाभाविक असतें हें ओळखून तें नाटकांत वेगळ्या रीतीने आणण्याचा प्रयत्न ठीक आहे, परंतु यांत संगीत जवळजवळ नाहीच म्हटलें तरी चालेल. असाच प्रयत्न बंगाली नाटककारांनी केलेला आहे, पण ते त्यांत भरपूर संगीत आणण्याची योजना करतात, आणि नाटक लोकप्रिय करण्याचा तो एक मार्ग आहे, कारण लोकांना संगीताची चटक लागलेली आहे. आर्थिक दृष्टीने नाटक यशस्वी करायचें असल्यास असें कांही तरी केलें पाहिजे, आणि समाजाच्या दृष्टीनेहि तेंच

ष्ट आहे, कारण पुस्तकी नाटकाचा परिणाम दृश्य नाटकाइतका होणें शक्य नाही.

२. **साष्टांग नमस्कार:** लेखक, **प्र. के. अत्रे**, प्रकाशक, **प्र. श्री. कोल्हटकर**, संपादक 'संजीवनी,' खटाववाडी, मुंबई नं. ४.

या कृतीला जरी नाटकाचें स्वरूप दिलें आहे तरी नाटकाचे गुण त्यांत पाहूं गेल्यास निराशा होईल. हा केवळ विनोद आहे, आणि लेखकाची विनोदाबद्दल ख्याति आहे, तरीपण विनोदाचे ढीग म्हणजे नाटक मात्र नव्हे.

---

# पाश्चात्य भूतरुषी

——=:०*०:=——

( लेखक, गुरुकिल्ली, 'हिंदी जादूगार,' पुणें. )

## डाक्टर होम यांची गुरुबाजी

फॉक्स बहिणींच्या भुताटकीमुळें जे अनेक रुषी उदयाला आले, त्यांची फसवेगिरी वरचेवर उघडकीला येऊनहि त्यांनी नांव कमावलें. अशा १०—१२ रुषीवर्यांत **होमगुरू**चा नंबर बराच वरती लागतो. **होम**मधील विशेष म्हणजे त्यानें आपल्या गुरुबाजीला बाजारी धंद्याप्रमाणें मोजकी फी न ठेवतां केवळ 'परोपकारार्थ' बुवा अगर महाराजगिरीचा शिष्टपंथ स्वीकारलेला होता.

**होम** महाराजांची छाप दुसऱ्यावर सहज पडे याचीं अनेक कारणें होतीं. तो स्वभावाने मोठा सद्गुणी व प्रेमळ भासे. आपण धार्मिक व भोळे असल्याचा तो दंभ करी. तो थोडासा आजारी दिसे यामुळें त्याच्याबद्दल सहानुभूति उत्पन्न होई. तो सुबक पोषख करी, त्याला दागिन्यांचा शोक असे आणि मुलें फार आवडत असत. या सर्व कारणांमुळें अंगी दुर्गुण असूनहि त्याला कोणीं दूर लोटलें नाही.

**होम** महाराज राजयोगी असल्यामुळे अनेक भोळसट श्रीमानांनी त्याला

उदार हातानें चैनींत ठेवले. अशा दातृत्वांत सुद्धां चढाओढ असल्यामुळें होम भोळसटांची वाण पडली नाही आणि त्यांनी आपल्या गुरूला दधात पडूं दि नाही. शिवाय **होम**च्या गरजा भुतेंच सांगत यामुळे दक्षिणा घेऊनहि गुरु को त्याही शिष्याचा मिंधा नव्हता. या प्रसन्न झालेल्या भुतांनीं **होम**च्या अंगा जडजवाहिर सुद्धां घालण्यास कमी केलें नाहीं. भूतयोनी चावट असते, यामु त्यांच्या कोणत्याहि कृत्याबद्दल **होम** जबाबदार नसे, तथापि भोळसट अजा ळांना नेमका गळ टाकण्याइतकीं हीं भुतें धूर्त होतीं. **होम**चे आरंभीचे प्रयो अगदींच सामान्य असत परंतु तो मेहनती आणि वेळेला वाटेल तें करणारा अस ल्यामुळें, त्यावर मूर्खांचा सहज विश्वास बसला.

**होम** कोठें व काय शिकला याची माहिती लागत नाही, पण त्याच्य बुद्धीची साक्ष पटते. वैद्यकीची डिग्री मिळवल्याचें तो सांगत असे, परंतु त्या तो धंदा कधींच केला नाही. त्याला शिल्पकला, ज्योतिष व संगीत अवग होतें व अनेक भाषा येत होत्या. त्याने दोन पुस्तकें लिहिलीं आहेत, त्यांच भावार्थ असा की इतर सर्व भूतऋषी लुच्चे असल्यामुळे त्यांची फसवेगिरी उघड कीस आलेली आहे. परंतु स्वतःची लुच्चेगिरीच नसल्यामुळे ती उघडकीस ये शकली नाही. शिवाय भुताटकी हा पोटाचा धंदा नसल्यामुळे असली बुवागिरी केवळ परोपकाराकरतांच केली पाहिजे.

**होमची** लबाडी एकदां कोर्टातच उघडकीस आली आणि खासगी रीतीने अनेक वेळां लोकांच्या नजरेस आली, परंतु त्याचा फारसा बभ्रा झाला नाही, कारण तो फी घेत नसे इतकेंच नाही तर तो कोणातरी श्रीमान शिष्टाचा पाहुणा असल्यामुळे त्याच्याविरुद्ध फारसें कोणी बोलत नसे. एकदां **ब्राउनिंग** कवि आपल्या पत्नीसह **होम**ची भुताटकी पहावयास गेले. तेथें अंधारांत **ब्राउनिंग**चें तान्हें पोर दिसूं लागलें. त्याला पकडतां तो **होम** महाराजाचा पाय सांपडला! शिवाय या कवीला मूलच नसल्याचें मागाहून समजलें!

१८५० मधें तो भुताटकीच्या कलेंत अगदीं कच्चा असतांहि त्याने अमे-



289540.

कें मोठ्या लोकांवर छाप बसवली. सरदार व राजेलोक यांच्या वाड्यांत याला प्रवेश मिळाला, आणि यांत फ्रान्सचा राजा व रशिआचा 'झार' होते, आणि झारच्या संमतीने त्याने तेथील एका श्रीमंत तरुणीशीं विवाह केला. वेळीं त्याला जवाहिर फार आवडूं लागलें. एकदां त्याच्या भुतांनी एक हिऱ्यांची कंठी सूक्ष्म सृष्टींत नेवून अदृश्य केली आणि पुढें ती जडसृष्टींत येईना. झडती घेतां तो होमच्या खिशांत सांपडली! अर्थात हें भुताचें कृत्य होतें! परंतु पोलिसाने त्याला रशिआबाहेर हांकून दिलें.

१८५९ मधें त्याने लंडनला आपलें बस्तान बसवलें. तो ' स्पिरिचुअल अथेनिअम् ' या संस्थेचा व्यवस्थापक असतां **जेन लायन** नांवाची श्रीमंत विधवा संस्थेंत आली. तिच्या नवऱ्याने ताबडतोब तिला कांही निरोप सांगितला, यामुळे तिच्याकडून **होम**ला २४००० पौंड मिळाले. भुतांनी तिचें मृत्युपत्र जाळलें आणि पुढें आणखी ६००० पौंड त्याला मिळाले. शिवाय भुतांनी अशी सूचना दिली की तिने **होम**ला दत्तक घेतल्यास तिच्या नवऱ्याला बरें वाटेल. तेव्हां **होम** तिचें आडनांव लावूं लागला, आणि त्याला खासगी खर्चाकरतां वर्षाचे ७०० पौंड मिळूं लागले. पुढें बाईने **होम**ला ३०००० पौंडांचा कागद लिहून दिला आणि फक्त त्याचें व्याज स्वतःकरतां ठेवलें. पुढें ही लुच्चेगिरी तिला समजली आणि तिने फिर्याद केली. बाईच्या बाजूचा निकाल झाला आणि तिच्या जबानीवरून व्हाइसचान्सेलरने असें लिहून ठेवलें की ' ही भुताटकी म्हणजे शुद्ध भ्रामक असून दुबळ्या मनाच्या मूर्खांना लुबाडणारी आहे. **सर वुइल्यम् क्रूक्स्** सारखा विद्वान देखील **होम**ला सच्चा समजला, यावरून शहाणे पंडित सुद्धां धूर्तांपुढें मूर्ख बनतात असें दिसतें.

**होम**च्या प्रयोगांतील विशेष म्हणजे तो आपल्या खुर्चीपासून अधांतरीं आडवा तरंगत असे आणि जमिनीपासून ७ फूट उंचीच्या खिडकींतून बाहेर पडून शेजारच्या खोलीच्या खिडकींत शिरून दाराने पुन्हां खोलींत येत असे. हा प्रकार ३ ऱ्या मजल्यावर होई, असें भोळसट लोक सांगतात.

'हिंदी जादूगार' शाळेंत गुरुगिरीला लागणारे सर्व प्रयोग शिक
जातात. दुसऱ्याच्या मनांतील हेतु ओळखणें, त्यांचें वर्तमान, भूत, भ
जाणणें, पूर्व जन्मींच्या अनेक गोष्टी सांगणें, रिकाम्या मुठींतून अंगारा अ
पेढा उत्पन्न करणें, 'दत्त' म्हणतांच चुळक्यांत गंगा उत्पन्न करणें, निपु
स्त्रियांना संतति देणें, इ. पत्रव्यवहाराकरतां ५ आण्यांचीं तिकिटें पाठवा. प्र
गाच्या लायकीप्रमाणें फी आकारूं. नांव गुप्त ठेवूं. फुकाचा पत्रव्यवहार करूं न
आमचें इंग्रजी मासिक 'इंडियन मॅजिशियन' अवश्य वाचा. वा. वर्गणी ट.
सह रु. २. यांत दर महिन्याला अनेक प्रयोग येत असतात.

---

# थोडक्यांत चुकलें!

—:o:—

## (गी द मोपसां वरून).

मी आफ्रिकेंत जायला निघालों, तेव्हां तूं माझी चेष्टा करीत होता
आणि मी परत येतांना एखादी रंगी बेरंगी कपडे घातलेली शिद्दीण बरो
आणीन की काय, अशी तुला भीतिही वाटत होती. गेल्या पत्रांत तूं मला लिहि
लेस, एखाद्या देशांतील लोकांची प्रेम करण्याची पद्धत मला कळली की तो दे
माझ्या ओळखीचा होतो, तेव्हां तूं मला आफ्रिकेसंबंधी अशा प्रकारची माहित
दे. प्रेमाच्या बाबतींत मी जरा हळवा आहें हें तुला माहीतच आहे आणि मा
प्रेम एखाद्या कृष्णवर्ण रमणीवर बसेल ही तुझी कल्पना कांही अगदींच अशक्य
कोटींतली नाही, कारण प्रेम हें नुसत्या रंगावर नसतें.

आतां येथल्या लोकांबद्दल ह्मणतोस तर ज्याला सात्विक, निर्विकार प्रेम
ह्मणतात, तें त्यांना कितपत शक्य आहे याची मला बरीच शंका आहे. पण
ज्याला विषयी प्रेम ह्मणून नाक मुरडणें हा शिष्टाचार आहे, पण बहुतेक लोकांना
जें मनांतून आवडतें, तें मात्र येथें भरपूर आहे. कदाचित येथल्या भयंकर उष्ण-

तिचा हा परिणाम असेल, पण असें आहे खरें.

आतां जास्त पाल्हाळ न लावतां माझीच हकीकत तुला सांगतों ह्मणजे तुला समजेल. शहरांत मीं एक लहानसें घर भाड्याने घेतलें आहे. येथल्या घरांना बाहेरच्या बाजूला खिडक्याच नसतात, आणि मधल्या चौकांतून सगळ्या घराला उजेड मिळतो. सारा दिवस एका मोठ्या दिवाणखान्यांत काढायचा आणि रात्रीं गच्चीवर निजायचें. उष्णतेमुळें येथल्या लोकांप्रमाणें मीहि जेवल्यानंतर दुपारी एक झोंप ताणून देऊं लागलों. पण झोंप येणार कशी ? कोच सुंदर मऊ होतें आणि वर एक गुलगुलीत गालीचा होता, पण मी पॅरिसहून निघून बरेच दिवस झाले होते आणि, तुला कदाचित खरें वाटणार नाही, पण निघाल्यापासून मी ब्रह्मचारी होतो.

तुला कदाचित कल्पना होणार नाहीं, पण जगांत दोन अडचणी अशा आहेत की त्यांत तूं कधी सांपडूं नये अशी माझी मनापासून इच्छा आहे. एक पाण्याची टंचाई आणि एक स्त्रियांची टंचाई. यांतलें अधिक भयंकर कोणतें हें मला सांगतां येणार नाहीं. येथल्या रूक्ष प्रदेशांत एक पेलाभर पाण्याकरतां मनुष्य खून देखील करील, आणि स्त्रियांकरतां खून पडतात हें तुला माहीतच आहे. येथें स्त्रिया नाहीत असें मात्र नाहीं. आहेत, पण त्यांच्याकडे जाण्यांत सर्व प्रकारचा धोका असतो असें म्हणतात.

अशा स्थितींत दुपारीं झोंप येईना म्हणून मी एकदां हिंडायला निघालों, रस्ते तापलेले होते, खमीस भिजून अंगाला चिकटत होता, तेव्हा मी समुद्राकडेच गेलों. समुद्रकांठाला सर्व शांत होतें, मनुष्य नाही, पशू नाही, एखादा पक्षी देखील नाही. इतक्यांत माझ्या मागे कांहीतरी आवाज झाला. आणि वळून पाहतों तों एका खडकापलीकडे एक बाई स्नान करीत होती. कोणी पहात नाही अशा कल्पनेने तिने सर्व कपडे काढून ठेवले होते, तिचें स्तनांपर्यंत शरीर समुद्रांत बुडलें होतें आणि मला न पाहिल्यामुळे ती त्या कांचेसारख्या पारदर्शक पाण्यांत बिनधोक वर-

खालीं होत होती. उन्हाने डोळे दिपत होते तरीहि मी हा सुंदर देखावा अनि मिष पहात होतों. इतक्यांत ती एकदम वळली आणि मला पाहून एक बारीकशी किंचाळी फोडून, अर्धवट चालत आणि अर्धवट पोहत, खडकामागे लपली. तिला बाहेर आलेंच पाहिजे हें जाणून मीहि तिची वाट पहात किनाऱ्यावर स्वस्थ बसलों. कांही वेळाने तिचे उंच बांधलेले केंस दिसूं लागले, आणि तिनें सबंध डोकें वर काढलें. तिचें तोंड रुंद, आणि डोळे धीट आणि टपोरे होते, आणि अंगकांति मूळची गोरी असून उन्हामुळे जुन्या हस्तिदंतासारखी झाली होती. ती म्हणाली, 'जा ना तेथून,' पण मी हालतों कशाला! ती पुन्हा म्हणाली, 'हें कांहीं बरें नाही, तेथें बसून राहणें!' तरीहि मी न ऐकलेंसें करून दगडासारखा बसून राहिलों. तिचें डोकें दिसत नाहींसें झालें. दहा मिनिटें गेलीं. नंतर पुन्हा केंस, डोकें, कपाळ, अगदीं सावकाश, जपून वर येऊं लागलीं. या वेळीं मात्र ती संतापलेली दिसली. ती म्हणाली, 'अशाने मी पाण्यांत राहून आजारी पडेन! तुम्ही तेथें आहांत तोंपर्यंत मी बाहेर येणार नाही.' मग मी उठलों आणि चालूं लागलों. अर्थात मधून मधून मागें वळून पहातच होतों. मी पुरेसा लांब गेलों असें तिला वाटल्यावर ती माझ्याकडे पाठ करून बाहेर निघाली आणि कपडे घालण्याकरितां एका खडकामागे गेली.

मी दुसऱ्या दिवशीं त्याच वेळीं तेथें आलों, तों तिचें स्नान चाललेंच होतें, पण आज तिच्या अंगांत पोहण्याचा पोषाख होता. मी येतांच ती आपले शुभ्र दांत दाखवून हंसूं लागली. आठ दिवसांत आमची चांगली ओळख झाली, आणि आणखी आठ दिवसांत ओळखीला सीमाच राहिली नाही. तिचें नांव मॅरोका, अर्थात हें टोपणनांव होतें, तिचे आईबाप स्पेनमधले, आणि नवरा फ्रेंच होता. त्याला कांहीतरी सरकारी नोकरी होती. ती काय होती याची मीं चौकशी केली नाही, पण त्याला काम पुष्कळ असे हें मात्र खरें.

नंतर तिने आपला स्नानाचा वेळ बदलला आणि दुपारच्या वामकुक्षीला ती माझेकडेच येऊं लागली. बाकी ती आली म्हणजे वामकुक्षि मात्र फारशी

होत नसे ! तिचें एकंदर शरीर जणू काय शारीरिक सुखाच्या दृष्टीनेच घडवलें होतें आणि तिच्या मनाचा कलहि विषयसुखाकडेच जास्त होता. कामुक डोळे, तीक्ष्ण दांत, चमत्कारिक आकाराचे, तोतापुरी आंब्यांसारखे, आणि जणू काय आंत एखादी स्प्रिंग असलेले स्तन, या सर्वांमुळें ती कामुक विचारांस सर्वथैव पोषक होती आणि तिची तृप्ति करणें जवळजवळ अशक्य होतें. तिचें मन म्हणजे दोन आणि दोन चार, इतकें सरळ होतें आणि तिचें खणखणीत हास्य म्हणजे तिचा सर्वांत गहन विचार. तिला आपल्या शरीरसौंदर्याबद्दल स्वाभाविक अभिमान इतका होता की त्यावर कोणतेंहि आच्छादन तिला खपत नसे. ती घरांत आल्याबरोबर तिचे कपडे गळून पडलेच, आणि ती तशीच इकडेतिकडे हिंडत असे, आणि चांगली थकली की तशीच निजत असे. तिचा नवरा कामावर असला म्हणजे ती संध्याकाळींहि येत असे आणि मग आम्ही गच्चीवर बसत असूं. तेथेंहि ती नग्नच असे आणि कितीहि चांदणें असलें तरी कोणी आपल्याला पाहील अशी भीति तिच्या मनाला शिवली नाही. ती कधीकधी विनाकारण किंचाळ्या फोडीत असे, आणि त्या ऐकून कुत्रे भुंकायला लागत असत.

एकदां मी अर्धवट झोंपेंत स्वस्थ पडलों होतों तों ती अगदीं माझ्या तोंडाजवळ तोंड आणून म्हणाली, 'तूं एकदा माझ्या घरीं निजायला ये ना !' मी म्हणालों, 'तुझ्या घरीं, आणि तें कसें जमणार ?' ती म्हणाली, 'न जमायला काय झालें ? माझा नवरा कामावर गेला की त्याच्या जाग्यावर तूं येऊन नीज.' मला हंसूंच येऊं लागलें. 'पण तूं येथे येतेसच. मीच कशाला तेथे आलें पाहिजे ? ती म्हणाली, 'म्हणजे मला आपली एक आठवण होईल.' मला कांही समजेना असें पाहून ती माझ्या गळयांत हात घालून म्हणाली, 'म्हणजे असें की माझ्या घरीं आलास म्हणजे तूं येथून गेलास तरी मला तुझी आठवण होईल आणि नवरा जवळ असला तरी तूंच आहेस असें मी समजेन. मी म्हणालों 'तुला लागलें आहे वेड. मी येथे आहें तो ठीक आहें.' अशा तऱ्हेने वाघाच्या तोंडांत मान द्यायची मला मुळींच इच्छा नव्हती, पण तिने माझी अतिशय विनवणी केली, शेवटी रडली देखील. हिचा इतका आग्रह कां, हें मला कांही

केल्या उलगडेना. एकदा मला वाटलें ती मनांतून नवऱ्याचा द्वेष करीत असे आणि त्याच्याच घरांत त्याच्यावर सूड उगवण्याकरतां म्हणून ती असें म्हण असावी. मी विचारलें, 'तुझा नवरा तुला फार जाच करतो का !' ती म्हणाली 'छे, तो कित्ती चांगला आहे.' मी म्हणालों. 'पण तुझें त्याच्यावर प्रेम नाही. ती म्हणाली 'वा ! माझें त्याच्यावर कित्ती प्रेम आहे, पण तुझ्यावर त्याच्यापेक्ष ज्यास्त आहे.' मी आणखी कांही बोलणार तों ती आपल्या तोंडाने माझें बं करून म्हणाली, 'ये ना, इतकें काय अगदीं !' मी येत नाही असें पाहून ती रागावून ताबडतोब निघून गेली.

तिने आठ दिवस तोंड दाखवलें नाही. नवव्या दिवशीं दारांत उभी राहून मला विचारते, 'आज माझ्याकडे निजायला येशील का ? नाहीतर मी चाललें.' तिला भेटून आठ दिवस झाले होते, आणि नाही म्हटले तर ती जाते, तेव्हा मीं कबूल केलें, आणि ती राहिली. रात्रीं ती जवळच्या रस्त्यांत माझी वाट पहात होती आणि मी आल्याबरोबर मला आपल्या घरीं घेऊन गेली. ती बंदराजवळ एका लहानशा घरांत रहात होती. दारांत शिरल्याबरोबर स्वयंपाकघर होतें, तेथेंच ती जेवीत असत. नंतर स्वच्छ पांढऱ्या भिंतींची एक खोली, सर्वभर फोटो लावलेली. ती आनंदाने नाचूं लागली आणि ह्मणाली, 'हें तुझेंच घर आहे, समजलें ?' मला थोडें चमत्कारिकच वाटत होतें आणि, सापडलों तर काय होईल या भीतीनें, कपडे काढायची माझी बिलकुल तयारी नव्हती, पण तिने माझें कांही चालूं दिलें नाही आणि माझे सर्व कपडे तिने शेजारच्या खोलींत नेवून ठेवले. नंतर माझी भीति कमी झाली आणि आह्मीं कांही काळ मजेंत घालवला. अशा रीतीने दोन तास गेले असतील तों कोणीं तरी दारावर धक्के दिले आणि ओरडलें, 'दार उघड, मी आहें.' ती घाबरून ह्मणाली 'माझा नवरा. पलंगाखालीं लप.' मी आपली विजार शोधूं लागलों, पण तिने मला वेळच दिला नाही. तसेंच पलंगाखाली ढकललें. मी मुकाट्याने सरपटत खालीं गेलों. नंतर ती स्वयंपाकघरांत गेली. एक कपाट उघडल्याचा आवाज झाला, नंतर ती कांही तरी घेऊन परत निजायच्या खोलींत आली आणि काय

आणलें होतें तें कोठेंतरी ठेवलें. तिचा नवरा मोठमोठ्यानें ओरडत होता. त्याला ती ह्मणाली, 'मला काड्यांची पेटी सांपडत नाहीं...हां, ही पहा सांपडली,' असें ह्मणून तिनें दार उघडलें. तो आंत आला, पण मला फक्त त्याचे पायच दिसत होते. त्या पायांच्या मानानें जर त्याचें एकंदर शरीर असलें तर तो राक्षसच असला पाहिजे. चुंबनाचा आवाज आला, जघनावर एक थाप मारलेली ऐकूं आली, नंतर तो ह्मणाला, 'पैशाचें पाकीट विसरलों, काय करणार, परत यावें लागलें. तुला चांगलीच गाढ झोंप लागली होती.' त्याने कपाटाचे खण उघडले आणि कांही तरी शोधूं लागला, नंतर बायको अंथरुणावर पसरली होती तिच्याशी लाडीगोडी करूं लागला, पण तिने त्रासून त्याला घालवून द्यायचा प्रयत्न केला. त्याचे पाय माझ्या इतके जवळ आले होते कीं, ते पकडले तर काय होईल, अशी एक वेडी कल्पना माझ्या मनांत येऊन गेली. ती त्रासलेली पाहून तो एक सशब्द चुंबन घेऊन गेला आणि एकदाचा दार लागल्याचा आवाज झाला, आणि माझ्या जिवांत जीव आला. मी सरपटत बाहेर आलों. माझी स्थिति अगदीं केविलवाणी झाली होती आणि मॅरोका जरी पोट धरधरून हंसत आणि नाचत बागडत होती तरी तिच्याकडे लक्ष न देतां मी एका खुर्चीवर धाडकन् अंग टाकलें, पण लगेच मीं तेथून उडी मारली, कारण मला खुर्चीवर कांहींतरी गार लागलें. वळून पाहतों तों लांकडें फोडायची एक लहानशी कुऱ्हाड खुर्चीवर ! ती तेथें कशी आली ? मी आलों तेव्हां तर मला दिसली नाहीं. आतां तर मॅरोकाला जास्तच हंसूं येऊं लागलें, पण मला मात्र खूप राग आला होता. हें नसतें संकट अंगावर ओढून घेऊन वर आणखी तिनें हंसावें हें मला कसेंसेंच वाटलें.

'आणि तुझ्या नवऱ्याने मला पाहिलें असतें तर ?' मी विचारलें. 'त्याची कांहीं भीति नव्हती,' ती म्हणाली. 'कशी नव्हती भीति ? तो जरा खालीं वांकला असता की मी दिसलों असतों,' मी म्हणालों. ती माझ्याकडे टक लावून म्हणते, 'पण तो खालीं वांकलाच नसता.' 'त्यांत कठिण काय होतें ? समज त्याची टोपी खालीं पडली असती, तर उचलायला वांकला असता कीं नाहीं ?

म्हणजे मी सांपडलों असतों, आणि या वेषांत! चांगलें आहे!' मी म्हणाल तिने गंभीर मुद्रा करून माझ्या खांद्यावर दोन्ही हात ठेवले आणि म्हणाल 'तो वांकला असता तर पुन्हा उठलाच नसता.' 'म्हणजे काय?' मी म्हणाल वांकलेल्या माणसाचें कुऱ्हाडीनें डोकें उडवण्याचा जेव्हां तिनें आविर्भाव केल तेव्हां मी तिचें इंगित समजलों.

एकंदरींत या गोष्टीवरून येथील पातिव्रत्य, प्रेम, अतिथिसत्कार, वगैरेबद्द तुला पूर्ण कल्पना आलीच असेल!

# पत्रव्यवहार

१. १२-६-३३

वि. वि. १. डोकींचे केस राखावेत की राखू नयेत? राखल्यास त्यांची निगा कशी ठेवावी? बाजारांतील डोकीस लावणेचीं तेलें वापरल्याने केस पांढरे होतात असें म्हणतात हें खरें की काय? डोकीवरून ऊन पाण्याचें स्नान केल्याने व साबण लावल्याने केस पांढरे होतात काय? केंस राखण्याने मान बारीक होते, डोळयांना त्रास होतो, हें कितपत खरें आहे? २. पुष्कळ स्त्रीपुरुष सकाळीं तोंड धुतेवेळीं घशांत बोटें घालघालून पित्त म्हणून पाडतात व तसें पित्त पाडावें की पाडूं नये? हितकर की अहितकर? ३.......कितीहि वेळा संग केला तरी संगानंतर शीतस्नान केलेस प्रकृति क्षीण होत नाही, हें खरें की काय? याच्या समर्थनार्थ शिवानंदांनी......पूरच्या......महाराजांचें उदाहरण दिलें आहे.

उ. केंस हें डोक्याचें नैसर्गिक आच्छादन आहे, ते राखल्यापासून सामान्यतः त्रास होण्याचें कारण नाही. फारसा घाम येत नसल्यास ते आठ दिवसांचे आंत धुण्याचें कारण नाही. केंसांस तेल लावण्याची फारशी जरूर नसते, तथापि फार कोरडे झाल्यास लावावें. सरसकट सर्व बाजारी तेलांस नांवें

ठेवण्यांत अर्थ नाहीं, तथापि तेलापेक्षां 'लाइमज्यूस् ॲन्ड् ग्लिसरीन्' लावावें. केंस धुण्याकरतां साबण लावण्याऐवजी 'ॲमोनिआ' लावणें फायदेशीर होईल. फार गरम पाणी स्नानाला वापरूं नये. केस राखल्याने मान बारीक होत नाहीं व डोळ्यांनाहि त्रास होत नाही. २. पोटांत कांहीं भलताच पदार्थ गेला असल्यास ओकारी काढल्यापासून फायदा होऊं शकेल, एरवीं आम्हास त्यांत फायदा दिसत नाही. ३. शीतस्नान सोसेल त्याने करावें, परंतु ज्यांस सोसत नसेल त्याने समागमानंतर शीतस्नान करण्यांत आमचे मतें विशेष धोका आहे. संभोगातिरेकाचे परिणाम शीतस्नानाने बंद होणें शक्य दिसत नाहीं. यां बाबतींत व्यक्ति तितक्या प्रकृति असतात, बेडकाने फुगून बैलाएवढा होण्याचा प्रयत्न करणें मूर्खपणा आहे. **सं.**

२. पुणें. २४–६–३३

वि. वि. १. स्त्रियांना स्वप्नावस्था होते काय? २. एखाद्या स्त्रीला कामेच्छा झाली हें तिच्या तोंडावरून ओळखतां येईल काय? ३. माझ्या मित्राचें नवीन लग्न झालें आहे, त्याची बायको सशक्त आहे पण तो अशक्त आहे, दोघांनाहि वाटतें आपणास पुत्र व्हावा, अटोकाट प्रयत्न केले परंतु व्यर्थ. कृपा करून उपाय सांगावा. आपला...

उ. १. स्त्रियांस स्वप्नावस्था होते. यासंबंधी मालतीमाधव नाटकांत मालतीच्या सखीने तिची चेष्टा केली आहे. २. विशेषतः स्त्रियांना या बाबतींत आपले विचार लपविण्याची संवय असते, तेव्हां ओळखणें कठिण. ३. अटोकाट प्रयत्न म्हणजे काय? नवीनच लग्न झालें असेल तर कांहीं दिवस वाट पहावी. पुरुष नपुंसक नसल्यास वंध्यत्वाचें कारण तज्ज्ञाशिवाय कळणार नाहीं, दोघांसहि तपासावें लागेल. **सं.**

३. २७–६–३४

वि. वि. मजला आज सुमारें दीड महिन्यापासून गर्मीचा विकार झाला आहे. सुरवातीलाच एकाने औषध दिलें तें मीं सात दिवस दह्यांत खाल्लें, परंतु

कांहीं गुण आला नाही नंतर वैद्य...यांचें ' उपदंशरुक्कुठार ' सात दिवस घेतले परंतु कांही गुण आला नाही. उलट व्रण विस्तृत झाला व जननेंद्रियाच्या उजव्या बाजूस बरीच सूजहि आली. अखेर वैद्यकीय इलाज बंद करून...येथें डॉ...... यांचेकडे जाऊन साल्व्हरसनचें एक इंजक्शन करून घेतलें, आता व्रण बराच कमी झाला असून त्याचे अंगी बराच मऊपणाहि आला आहे. तरी माझ्या शरीरांत हा रोग १२–१३ वर्षांपासून असावा असें माझें मत आहे. माझें वय हल्लीं ३३ वर्षांचे असून माझ्या जननेंद्रियावर गर्मीचे व्रण पूर्वी बरेच वेळां लहान प्रमाणावर झाले होते, त्या वेळेस मी त्यांचेवर आयडोफॉर्म वगैरे टाकीत गेल्यामुळे १–२ दिवसांतच व्रण नाहीसे होत असत. आताच्या अवस्थेंत आयडोफॉर्म टाकिला असता कोणत्याहि प्रकारें जखम कमी न होतां जास्तच प्रमाणांत वाढत गेली. तुम्ही गर्मीच्या रोगावर उपचार करीत असाल तर मी तुमचेकडेस येऊन औषधोपचार करण्यास तयार आहे, काय खर्च येईल तो कळवाल अशी आशा आहे. मुंबई येथें मोफत औषधोपचार ( तुमच्या पद्धतीप्रमाणे ) करणारी संस्था असल्यास तिचे नांव व पूर्ण पत्ता कळवाल अशी आशा आहे. तुमचेकडेस निओसाल्व्हर्सन, बिस्मथ व पाऱ्याचे रसायनाचे टबूब मिळत असल्यास किंमत कळवावी. हीं सगळीं इंजक्शनें डाक्टराकडून घेण्याची व्यवस्था केलेली आहे.... आपला सुवर्णकार.

**उ.** आयडोफॉर्मनें बरे होणारे व्रण गर्मीचे नव्हत. तृतीयावस्थेंतील व्रण असल्यास एका इंजेक्शेनाने कांही परिणाम होणार नाही. झाल्यास तात्पुरताच होईल. हे रोग तज्ज्ञाशिवाय बरे होणें जवळजवळ अशक्य आहे, आणि वैद्यांची गोष्टच सोडली तरी सर्व डाक्टरहि यांत तज्ज्ञ नसतात. मोफत उपचार पाहिजे असल्यास ' म्युनिसिपल दवाखाना, नं. ६६, लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ८,' येथें तपास करावा. आम्ही स्वतः उपचार करीत नाही, परंतु खर्च करण्याची तयारी असल्यास तज्ज्ञाकडून सल्ल्याची व्यवस्था करूं, मात्र येथे आलें पाहिजे, पत्रानें काम होणार नाही. सं.

# शारदेचें पत्र

अलीकडे बऱ्याच पत्रांतून श्रद्धानंदाश्रमाचा रिपोर्ट प्रसिद्ध झालेला तूं पाहिला असशील. तो आश्रम प्रत्यक्ष कसा आहे हें पाहण्याची मला फार दिवस इच्छा होती. स्वतः जाऊन पहायचा प्रसंग कांही मला आला नाही. पण तेथें गेलेल्या दोन गृहस्थांनी त्याची हकीकत मात्र परवां मला सांगितली, ती तुला जशीच्या तशीच सांगतें.

"आम्ही दादरच्या स्टेशनावर उतरून, एका मित्रानें सांगितलेल्या खुणेवरून नेमक्या इमारतीशीं गेलों आणि तेथे तळमजल्यावर शोध करून, एक जिना चढून आश्रमाच्या दाराशीं पोचलों. दरवाजा बंद होता, आणि आम्ही आल्याची वर्दी देण्याकरतां घंटा किंवा इतर कांहीहि साधन नव्हतें. आम्ही दुपारीं १२ वाजतां गेलों आणि दरवाज्यावर भेटण्याची वेळ निराळीच लावली होती. तथापि तसेंच परत जाणें बरें न वाटल्यामुळे आम्हीं दरवाजा बराच वाजवला तेव्हां दरवाजाशेजारची एक लहानशी झडप उघडून, गजांतून एका बाईने बाहेर पाहिलें व आम्हांस व्यवस्थापिकेस भेटायचें आहे असें समजल्यावर तिनें आंत तसें कळवलें आणि सुपरिटेंडंट् बाई दरवाजाबाहेर येउन आमचेजवळ बोलूं लागल्या. आह्मीं त्यांस सांगितलें कीं आमचेपैकी एकास स्वयंपाक वगैरे घरकामाकरतां बाई पाहिजे आहे, आणखी आमचे एका मित्रास लग्न कर्तव्य आहे, आणि या दोन्ही गरजांना योग्य बाया आश्रमांत मिळण्याचा संभव आहे असें कळल्यावरून आह्मी आलों आहों. बाई ह्मणाल्या, स्वयंपाकाला पाठवण्यासारखी बाई सध्या नाही, आणि ज्यांना लग्न करायचें असेल त्यांनीं स्वतःची सर्व माहिती देऊन एका छापील कागदावर अर्ज करावा आणि तो अर्ज कमिटीला पसंत पडल्यास ते त्याचा विचार करतील: नंतर आमचेपैकी एक बाहेर गांवाहून मुद्दाम संस्था पाहण्याकरतां आल्याचें कळतांच बाईनी सौजन्यानें सांगितलें की

पाहण्याची ही वेळ नसली तरी दाखविण्याची व्यवस्था करूं, आपण दोन मिनिटें वाट पहा, तयारी झाल्यावर कळवतें. नंतर प्रथम गजांतून पाहिलेल्या बाईंना त्यांनी सर्व तयारी करण्यास सांगून दोन मिनिटांनी आम्हांस आंत बोलावलें. बाई म्हणाल्या, आमची संस्था पाहण्याची सर्वांस मोकळीक आहे. आंत गेल्यावर एक सज्जा लागला आणि सज्जाच्या टोंकाला बाईंचें आफिस होतें. त्या तडक आफिसांत गेल्या आणि त्यांचे मागोमाग आम्ही गेलों. वाटेंत कांहीं खोल्यांची दारें मोकळीं दिसलीं, परंतु तथें एक चिटपाखरूं देखील आम्हांस दिसलें नाही. अर्थातच आम्हांस दाखवण्याची तयारी म्हणजे तेथील सर्व बायांस अदृश्य करणें, हें आम्ही समजलों. बाईंची अशी प्रामाणिक कल्पना दिसली की संस्था दाखवायची म्हणजे लोकांना सज्जांतून आफिसांत नेऊन पावतीबुक काढायचें आणि कोणी कांही दिल्यास त्याला पावती द्यायची, आणि तसें त्यांनी केलें. आमच्यापैकी एकाने पांच रुपयेहि दिले व पावती घेतली. यानंतर बाईंनी विशेष सौजन्य दाखवून तेथील कांही लग्न करून गेलेल्या बायकांचे पतींसह फोटो दाखवले. तेव्हां निदान पुरुषांना तरी, पावतीबुक आणि फोटो, याशिवाय कांही दाखवायचें नाही असें बाईंचें किंवा कमिटीचें मत असलें पाहिजे. तेथील बायांस शिक्षणाची कांही सोय आहे काय, असें विचारतां बाईंनी साफ सांगितलें:—शिक्षण हें आमचें ध्येय नाही, शिक्षणापासून कोणताहि फायदा नाही, कारण अशिक्षितांप्रमाणेंच सुशिक्षित स्त्रियाहि श्रद्धानंदाश्रमांत येतातच. स्त्रियांची मुख्य गोष्ट म्हणजे त्यांचें 'सील' (हा 'शील' शब्दाचा बाईंचा उच्चार होता. बाई अशिक्षित होत्याच, परंतु अशिक्षित ब्राह्मण स्त्रिया देखील असा उच्चार करतील अशी आमची कल्पना नव्हती. बाईंना इंग्रजी येत नव्हतें हें उघड होतें, आणि येत असतें तरीहि या पोक्त बाई चेष्टा करतील अशी कल्पनाहि कोणाच्या डोक्यांत आली नसती). तें 'सील' जोंपर्यंत शाबूद आहे, तोंपर्यंत तिची किंमत आहे, एरवीं नाहीं, मग तिला शिक्षण असो वा नसो. अर्थात त्यांना धार्मिक शिक्षण देवून त्यांचा सर्व खर्चहि आम्ही चालवतों, मग त्यांना शिक्षण कशाला पाहिजे? शेवटीं औदार्याचा कळस म्हणून त्यानी

असेंहि सांगितलें की एखाद्या बाईवर आमचा विश्वासच बसला आणि ती एकटी शाळेंत जायला योग्य आहे असेंच आम्हाला वाटलें, आणि तिने शिक्षणाचा तितका आग्रहच धरला, तर आम्ही कदाचित तिची शिक्षणाची व्यवस्था करूं, पण तें कांही आमचें ध्येय नाहीं, आमचें ध्येय म्हणजे 'सील.' बाईंनी रिपोर्ट दाखवला, त्यांत कांही स्त्रिया पळून गेल्याचा उल्लेख होता. तेव्हां आम्हीं म्हटलें, या पळून जातात याचा अर्थ असा होतो की तुम्ही त्यांना जबरीने येथें कोंडून ठेवतां! बाई म्हणाल्या, अर्थात, आम्ही काय त्यांना पाहिजे तिकडे जावूं देवूं? सील राहतें, पुण्य लागतें, मग येथून त्यांनी कां जावें?"

यावरून इतकें सिद्ध होतें की या संस्थेला जरी आश्रम असें नांव दिलें, तरी तो तुरुंग आहे, तेथें सर्व अरेरावीचा आणि दडपशाहीचा कारभार आहे. अशी दडपशाही करण्याचा कायदेशीर हक्क देखील त्यांना पोंचतो असें वाटत नाही, पण गरीब बिचाऱ्या बाया त्यांच्या हातांत सांपडल्यावर त्यांना तारणार कोण? त्या तुरुंगांत रहावें किंवा पळून जातां आलें तर जावें. 'सील' कायम ठेवायचें हाच त्यांचा मुख्य उद्देश असल्यामुळे त्यांना कोंडून ठेवणें हाच त्याचा उत्तम उपाय, आणि याकरतांच त्यांनी तेथें एक अशिक्षित, पोक्त, धार्मिक बाई नेमली आहे. या मारून मुटकून नीतीची काय किंमत आहे?

मूर्खांनाच पुण्य अधिक लाभतें असें एकंदरींत दिसतें खरें. याचें पौराणिक उदाहरण म्हणजे 'पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः' या दोन्ही पुण्यवान लोकांनी द्यूतांत आपलें सर्वस्व गमावलें, इतके ते मूर्ख किंवा व्यसनी होते. तरी ते आदर्शभूत समजायचेच, हां!

ज्ञानकोशवाले केतकर हल्लीं व्यवहारज्ञानावर विशेष भर देतात असें दिसतें. 'पुरुषांचें आज वर्चस्व आहे आणि तें थोडेंबहुत नेहमीच असायचें. कारण स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळणें फारसें शक्य नाहीं, तेव्हां स्त्रियांनी तें कबूल करण्यांत शहाणपणा आहे, 'ऐंद्रिय' नीतीचें दुहेरी परिमाण असायचेंच कारण पुरुषांची अनीति बाहेर फुटत नाही आणि बायकांची फुटते, तेव्हां या बाबतींतहि स्त्रियांनी स्वातंत्र्य मिळवण्याच्या भानगडींत पडूं नये. पडल्या तर

त्यांचेंच नुकसान होईल' असा एक पोक्त उपदेशाचा डोज् त्यांनी 'स्त्री'च्या वाचकांना पाजला आहे. काय असावें, हा प्रश्नच केतकरांजवळ नाही. असलेल्या परिस्थितींत कसें वागावें हें ते सांगतात. पुरुषांची 'अनीति' बाहेर येत नाही बायकांची येते, तेव्हां बायकांनी अनीति करूं नये असें त्यांचें म्हणणें. सांपडल्याशिवाय ज्याला चोरी करतां येईल तो ती करणारच, इतकी सफाई ज्यांच्यांत नसेल त्यांनी चोरी करूं नये, असेंच जर म्हणायचें असलें तर त्याचा असा उघड अर्थ होतो की स्त्रियांना जर उघडकीस आल्याशिवाय 'पाप' करतां आलें तर त्यांनी तें खुशाल करावें, ज्यांना इतकी अक्कल नसेल त्यांनी मात्र जपून वागावें. ठीक आहे !

'नवजीवन' मासिकांत संपादकांनी किंवा दुसऱ्या कोणीं 'आंधळ्यांची शाळा' नाटकाच्या प्रयोगावर हास्यास्पद टीका केली आहे. त्यांत नायिकेची भूमिका ज्योत्स्ना भोळे करतात आणि तिच्या बापाची दाते करतात. नाटकांत बाप मुलीला आलिंगन देतो, हें पाहून हे गृहस्थ म्हणतात की दाते परस्त्रीला आलिंगन देतात. नाटक पाहण्याची पात्रता त्यांच्या अंगांत नाही इतकेंच यावरून दिसतें. बालगंधर्वांच्या सौभद्राला हे गृहस्थ गेले की स्टेजवर दोन पुरुष एकमेकांना आलिंगन देतात असेंच यांना वाटायचें, आणि तें हे विद्वान पसंत करतात ! आहेत झालें !

तुझी शारदा.

---

**स्त्रियांस मतदानाचा हक्क.** ( डॉ. प्रॉशोव्स्की ) स्त्रियांस मतदानाचा हक्क दिल्यास तो वेश्यांसहि मिळेल असा एक आक्षेप प्रतिपक्षी आणीत असतात, यावरून प्रचलित लिंगनीतींत किती ढोंग भरलेलें आहे हें स्पष्ट दिसतें. जोंपर्यंत व्यक्तींच्या अन्नपाण्याची हमी समाज घेत नाही, तोंपर्यंत शरीराची किरकोळ विक्री म्हणजे वेश्यावृत्ति, आणि घाऊक विक्री म्हणजे पैशाकरतां विवाह, हीं दोन्ही कायम राहणार. परंतु वेश्या जर हलकट असतील, तर त्यांजकडे जाणाऱ्या पुरुषांसहि तितकेंच हलकट समजलें पाहिजे. हल्ली सामान्य स्त्रियांपेक्षां वेश्यांचा बौद्धिक व नैतिक दर्जा कमी असतो खरा, परंतु हें

जरी सामान्यतः खरें असलें तरी त्यांत अपवादहि असतात आणि कांही वेश्या अत्यंत प्रामाणिक असून गिऱ्हाइकांस नागवण्याची संधि आली असतांहि तिचा फायदा घेत नाहीत. कांही तर केवळ प्रथम कोणींतरी पुरुषानें फसवल्यामुळें मूल पोसण्याचा प्रसंग आल्यामुळेंच वेश्यावृत्ति पतकरतात व कांहीच्या अंगावर आप्तेष्टांचाहि भार असतो. शिवाय कांही वेश्या हलकट असतात असें धरलें तरी पुष्कळ पुरुषहि हलकट असतात आणि त्यांस मतदानाचा हक्क असतो, मग तो वेश्यांनाच कां असूं नये ? उदाहरणार्थ वेश्यांवर देखरेख ठेवण्यास पोलीमधील जे लोक नेमलेले असतात, ते माझे मतें वेश्यांपेक्षांहि हलकट असतात. अर्थात यांतहि अपवाद असतात. परंतु वेश्यांवर अशा प्रकारची सत्ता त्यांस दिल्यामुळे सामान्यतः ते त्याचा मनास येईल तसा फायदा घेतात, यांत मोठेंसें नवल नाही. मी **कोपनहेगन्** येथें असतांना ही हलकट पोलिसांची संस्था बंद करण्यास अंशतः कारण झालों. स्त्रियांस मताचा हक्क दिल्यास स्त्रियांच्या व लहान मुलांच्या हिताच्या इतर सोयी निःसंशय होतील.

---

**मलावरोधावर उत्तम उपाय.** आपल्या अनैसर्गिक जीवनामुळे व विशेषतः अन्नाच्या कृत्रिमपणामुळे बहुतेक सर्वांस कधीकधी मलावरोध होतो. यावर सर्वांत उत्तम उपाय म्हणजे 'लॅक्टोज्' किंवा 'मिल्क् शुगर' (म्हणजे दुधापासून काढलेली साखर) हा होय. ही औषधांचे दुकानांत विकत मिळते. हा वास्तविक दुधाचाच एक भाग आहे, औषध नाही, यामुळे हें पुष्कळ दिवस घेतलें तरी अनिष्ट परिणाम होत नाहीत. याने रेच झाले तरी इतर रेचकांप्रमाणें याने थकवा येत नाही. हें घेण्याची रीत म्हणजे दिवसांतून दोनदा, जेवणापूर्वी एक तास, दोन मोठे चमचे सपाट भरून पाण्यांतून घेणें, किंवा सकाळीं चहांतूनहि घ्यावें. जरूरीप्रमाणें घेऊन पोट साफ राहूं लागलें म्हणजे हें कमी घ्यावें किंवा दिवसांतून एकदांच घ्यावें किंवा बंद करून जरूर वाटल्यास पुन्हां घ्यावें. याचा आम्हीं स्वतः अनुभव घेतला आहे.

**शस्त्रक्रियेबद्दल खटला.** हल्लीं ऑस्ट्रियामधें संततिनियमनासंबंधी

एक महत्वाचा खटला चालू आहे. गेल्या दोन वर्षांत शंभरांवर पुरुषांनी संतति-प्रतिबंधाकरतां स्वतःवर शस्त्रक्रिया करून घेतली, त्यासंबंधी तेथील 'ॲनार्किस्ट' पक्षाचे प्रमुख **हेर प्येर रामुस** व २० इतर लोक या खटल्यांत आरोपी आहेत आणि कांही जगप्रसिद्ध विद्वान साक्षीदार म्हणून बोलावले आहेत, त्यांत डॉ. **व्हॉरॉनॉफ्, डॉ. ष्टायनाक्** व डॉ. **माग्नुस् हिर्शफेल्ड** हे आहेत. ही शस्त्रक्रिया कायदेशीर समजणें जरूर आहे असें **हेर रामुस** यांनीं आपल्या जोरदार भाषणांत सांगितलें. ते म्हणाले 'मी जरी आरोपी आहें तरी मला बिलकुल पश्चात्ताप होत नाहीं, उलट या शस्त्रक्रियेची जरूरी सर्वांस समजावून देण्याची संधि मला दिल्याबद्दल मी सरकारी वकिलाचे आभार मानतों. पुष्कळ डाक्टर ही शस्त्रक्रिया करीत आहेत व त्याबद्दल जबर फी घेत आहेत. हें चूक आहे. हा हक्क श्रीमंतांकरतां राखून न ठेवतां गरिबांस हें सहज करून घेतां येईल अशी व्यवस्था केली पाहिजे. नालिकांचा छेद म्हणजे खच्ची करणें नव्हे हें लोकांस समजावून दिलें पाहिजे. नॉर्वे, स्वीडन आणि अमेरिकेंतील २७ संस्थानांत तें कायदेशीर आहे, आणि हें १६००० पुरुषांवर यशस्वी रीतीने केल्याबद्दल मजजवळ आंकडे आहेत. माझ्या बायकोला मुलें होतच नाहींत, तेव्हां मला स्वतःला याची जरूर नव्हती, परंतु केवळ उदाहरण घालून देण्याकरतां मीं हें ऑपरेशन करून घेतलें. तें सुप्रजाजननाच्या दृष्टीने अवश्य आहे आणि हें आपण होऊन करून घेण्याची चाल सर्व जगभर पडली पाहिजे.' इंग्लंदांत वेडसर लोकांवर हें ऑपरेशन सक्तीने करण्याबद्दल अमेरिकेप्रमाणेंच कायदा करण्याकरतां एक बिल आलें आहे, परंतु या खटल्यांत तें आपखुषीने करून घेण्याचा प्रश्न आहे. ( न्यूज ऑफ दि वर्ल्ड ). आरोपींस दोषमुक्त केल्याचें समजतें.

---

**आणखी एक सांसर्गिक रोग.** राजकारण हा संसर्गजन्य रोग असावा असें दिसतें, एरवी पुण्यांतील राजकीय पुढाऱ्यांच्या सभेला **श्री. कस्तूरबा गांधी** आणि **लेडी ठाकरसी** यांना बोलावण्याचें काय कारण ? महात्मा गांधींच्या सान्निध्याने त्यांस हा रोग जडला असावा.